# नियम क्र. ८/२०१४

## विद्यापीठाच्या जलतरण तलावाचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे (सुधारणा) नियम - २०१४

**ज्याअर्थी,** विद्यापीठाच्या जलतरण तलावाचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे नियम क्र. ४/२०१४ मध्ये सुधारणा करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेने दिनांक ३१.७.२०१४ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र.१५६ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

**त्याअर्थी,** व्यवस्थापन परिषद सदर नियमात सुधारणा करण्याकरिता खालीलप्रमाणे नियम तयार करीत आहे.

१) हे नियम विद्यापीठाच्या जलतरण तलावाचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे (सुधारणा) नियम, २०१४ म्हणुन संबोधण्यात येतील.

२) हे दुरूस्ती नियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या दिनांकापासुन अस्तित्वात येतील.

३) मुळ नियम क्र. ४/२०१४ च्या परिच्छेद ५) मधील ‘‘जलतरण तलावाचा उपयोग घेण्यासाठी जलतरण तलाव सकाळी ६.०० ते १०.०० व’’ या शब्दानंतर ‘‘सर्व सदस्यांकरिता उघडा ठेवण्यात येईल’’ या शब्दापुर्वी ‘‘दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.००’’ हे शब्द वगळण्यात येत असुन **‘‘दुपारी ५.०० ते सायंकाळी ७.००’’** ह्या शब्दांचा समावेश करण्यात येत आहे.

४) मुळ नियम क्र. ४/२०१४ च्या परिच्छेद ५) मधील ‘‘प्रत्येक सदस्यास पोहण्याकरिता ४५ मिनीटांचा कालावधी त्याने आवेदनपत्रात नमुद केलेल्या वेळेमध्ये व सर्व’’ या शब्दानंतर ‘‘२६ जानेवारी, १५ ऑगस्ट, ०१ मे, होळी आणि धुलीवंदन हे दिवस वगळता उपलब्ध करून दिला जाईल.’’ या शब्दापुर्वी ‘‘गुरूवार’’ हा शब्द वगळण्यात येत असुन **‘‘रविवार’’** ह्या शब्दाचा समावेश करण्यात येत आहे.

*****